**सं.फौ.ख.क्र.३२९/२०२० मधील निशाणी क्र. ५८ वरील आदेश**

**किरण लक्ष्मण गजीणकर वि. उमेश मधुकर सावंत**

प्रस्तुतचा अर्ज आरोपीने त्याच्याविरुध्द झालेला ''उलटतपास नाहीचा'' आदेश रद्द होवून उलटतपास घेणेस परवानगगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. आरोपीच्या मते, सदर केसमध्ये फिर्यादीचा सरतपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीतर्फे उलटतपास घेतला नाही. म्हणुन आरोपीतर्फे उलटतपास नाही असा आदेश पारीत केलेला आहे. सदर केसचे पुर्वी कामकाज वकील निरवडेकर हे पाहत होते व आता वकील जी.एस.देसाई यांनी वकीलपत्र सादर केलेले आहे. सदर केसच्याकामी आरोपीतर्फे उलटतपास न घेतल्यास आरोपीचे अपरिमीत असे नुकसान होणारे आहे. त्याप्रमाणे आरोपीच्या न्यायहक्कावर गदा येणारी आहे. तसेच आरोपीस अनेक प्रकारची फौजदारी स्वरुपाची कामे चालवावी लागून आरोपीचा वेळ व पैसा वाया जाणार आहे. सबब अर्ज.

३. फिर्यादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदरची केस दि.०१.१०.२०२० रोजी दाखल केल्यानंतर दि.०६.१२.२०२१ रोजी आरोपी हजर झालेला आहे. त्यानंतर दि.११.०७.२०२३ रोजी फिर्यादीचा सरतपास पुर्ण केल्यावर सुमारे ८-९ तारखांनंतर दि.०२.०४.२०२४ रोजी उलटतपास नाहीचा आदेश केलेला आहे. त्यानंतर दि.०७.१०.२०२५ रोजी पोलीसांनी पकड वॉरंटद्वारे आरोपीस अटक करुन कोर्टात हजर केले आहे. सदरची केस फौ.प्र.सं.क.३१३ प्रमाणे आरोपीच्या जबाबासाठी दि.०२.०४.२०२४ पासुन प्रलंबीत आहे. आरोपीने जाणुनबुजुन याकामी केवळ विलंब करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्जाकामी योग्य व संयुक्तीक कारण आरोपीने नमुद केलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे व अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्च आकारण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता दि.०१.१०.२०२० रोजी दाखल

केल्यानंतर दि.०६.१२.२०२१ रोजी आरोपी हजर झाला. त्यानंतर दि.११.०७.२०२३ रोजी फिर्यादीचा सरतपास पुर्ण केल्यावर आरोपीस उलटतपासास उचित संधी उपलब्ध करुन दिल्यानंतर आरोपीने फिर्यादीचा उलटतपास न घेतल्याने दि.०२.०४.२०२४ रोजी आरोपीविरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश पारीत करणेत आला.

५. आरोपीने उलटतपास न घेण्यामागे कोणतेही कारण अर्जामध्ये नमुद केलेले नाही. तसेच आरोपी हा दरम्यानचे कालावधीमध्ये सुमारे दिड वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी न्यायालयात गैरहजर होता. दि.०२.०४.२०२४ पासून प्रकरण फौ.प्र.सं.क.३१३ अन्वयेचे जबाबासाठी प्रलंबीत आहे. त्यानंतर दि.०७.१०.२०२५ रोजी आरोपीस पकड वॉरंटच्या अंमलबजावणीमध्ये पकडुन न्यायालयासमोर आणण्यात आले होते. त्यानंतर आरोपीस जामीनावर मुक्त करण्यात आले. तथापि, केसचे स्वरूप विचारात घेता आरोपीस त्याचा बचाव शाबित करण्याकरीता उलटतपासाची एक संधी उपलब्ध करून देणे न्यायोचित होणार आहे. तसे केल्यास फिर्यादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास आरोपीस त्याचा बचाव शाबीत करण्यापासून परावृत्त केल्यासारखे होणार आहे. फिर्यादीस झालेला त्रास हा खर्चाचा रूपाने भरून काढता येण्याजोगा आहे. सबब, आदेश.

**आदेश**

१. अर्ज, फिर्यादी यांना खर्चादाखल रक्कम रूपये १,०००/– (रु.एक हजार मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. आरोपीविरूध्द, फिर्यादीचा 'उलटतपास नाहीचा' पारीत झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने सदर खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत फिर्यादीस द्यावी.

SHIVAJI PANDURANG PATIL

Digitally signed by SHIVAJI PANDURANG PATIL
Date: 2026.08.13 15:52:09 +0530

दिनांक:– १३/०८/२०२६ (एस. पी. पाटील)

ठिकाण:– सावंतवाडी न्यायदंडाधिकारी वर्ग–१,सावंतवाडी